

## बँकेच्या सातत्यपूर्ण यशामागे आहे

# आपणा सर्वांचा अढळ विश्वास

५५ वा वार्षिक अहवाल
सन २०१५-१६

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

ऑडिट वर्ग 'अ'

# श्री छत्रपती शिवाजी महाराज



सहयाद्रीचा सिंह गर्जतो । शिवशंभू राजा ।
नसांनसातुन नाद गुंजतो । महाराष्ट्र माझा ।।

## प्रेरणास्थान



# मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार

अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



कणखर नेतृत्व व कुशल मार्गदर्शक

## मा. आ. श्री. अजितदादा पवार

माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

बारामतीचे भूषण

## मा. खा. सौ. सुप्रिया सुळे





श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

# दि बारामती सहकारी बँक लि.

## संचालक मंडळ

(सन २०१५ ते २०२०)



श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष



श्री. रमणिक रामजी मोता



श्री. सचिन सदाशिव सातव



ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी



श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के



श्री. दिग्विजय पोपटराव तुपे



श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर



श्री. आदेश अनिलकुमार वडुजकर



श्री. उध्दव सोपानराव गावडे



श्री. सुरेश गुलाबराव देवकाते



श्री. विजयराव प्रभाकर गालिंदे



श्री. कपिल राजेंद्र बोरावके



डॉ. वंदना उमेश पोतेकर



सौ. कल्पना प्रदिप शिंदे



श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)



श्री. सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक



श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

# दि बारामती सहकारी बँक लि.

## बँकेच्या ई लॉबी सेवा केंद्र उद्‌घाटन सोहळ्याची क्षणचित्रे

रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६












## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांसाठी)
## विशेष सूचना

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २० ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ८.३० वाजता राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती या ठिकाणी बोलविण्यांत आली आहे. सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यांत येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**❋ सभेपुढील विषय ❋**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १५ ऑगस्ट २०१५ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
३. सन २०१५-२०१६ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांष जाहीर करणे.
४. मा. सरकारी लेखापरिक्षक यांनी तपासणी केलेल्या सन २०१५-२०१६ सालच्या आर्थिक हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे. तसेच सन २०१४-१५ च्या वैधानिक लेखा परिक्षण दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.
५. सन २०१६-२०१७ या वर्षासाठी बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी सरकारी लेखापरिक्षक व स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे चालू आर्थिक वर्षात असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८. सन २०१६-२०१७ या आगामी आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.
९. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०. बँकेच्या शाखांकरिता जागा खरेदी करण्यासाठी इमारत निधीमधून रक्कम काढण्याबाबतचा अधिकार संचालक मंडळास देणे.
११. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयांचा विचार करणे.

**दिनांक : १ ऑगस्ट २०१६**
**स्थळ : बारामती**

**मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेनुसार**
**श्री. गो. बहुळकर**
**कार्यकारी संचालक**

## ✻ विशेष सूचना ✻

१. ही सभा कोरम अभावी तहकूब करावी लागल्यास सभा अर्धा तास तहकूब केली जाईल व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा घेतली जाईल. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.

२. सभासदांना वर नमूद विषया संबंधी काही विचारावयाचे असल्यास तसे त्यांनी दि. १६.०८.२०१६ अखेर पर्यंत बँकेत लेखी कळवावे. त्यांनतर आलेल्या पत्रांच्या विषयाचे अथवा शंकांचे निरसन करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.

३. सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांषाची रक्कम बँक सभासदांच्या बँकेतील सेव्हिंग्ज्/चालु किंवा अन्य खात्यात जमा देत असते. ज्या सभासदांचे खाते बँकेत नसेल त्यांनी त्वरित खाते उघडून या सेवेचा लाभ घ्यावा.

४. ९७ व्या घटनादुरूस्तीनंतर सभासदांची वर्गवारी क्रियाशिल सभासद व निष्क्रीय सभासद अशी करण्यांत येत आहे. यापुढे क्रियाशिल सभासदांनाच संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. क्रियाशिल सभासदांसाठी पुढील अटी आहेत.

   १. बँकेच्या पोटनियम क्र. १४ व १५ नुसार सभासदाने कमीतकमी रु. १५००/- चे भाग धारण करणे आवश्यक आहे. तसेच पाच वर्षात एकातरी वार्षिक सभेस उपस्थित रहावयाचे आहे.

   २. सभासदाची बँकेत रुपये सात हजाराची ठेव असावी किंवा त्यांचा रुपये एक लाखाचा कर्जव्यवहार असणे आवश्यक आहे.

तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी व ज्या सभासदांनी हे निकष पुर्ण केले नसतील, तर त्यांनी ते पुर्ण करावेत.

### मुख्यालय व शाखा संपर्क क्रमांक

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| ०१ | मुख्यालय (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४/९९२२४४४१५० |
| ०२ | बारामती शाखा | (०२११२) २२४८६६, २२७७०४ /९९२२४४४१५१ |
| ०३ | इंदापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१११) २२३२७७, २२४७६६ /९९२२४४४१५३ |
| ०४ | भिगवण शाखा | (०२११८) २४६२०५ / ९९२२४४४१५४ |
| ०५ | दौंड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११७) २६४४७७, २६४९५९ /९९२२४४४१५५ |
| ०६ | चिंचवड शाखा | (०२०) २७४५०११०/ ९९२२४४४१५६ |
| ०७ | कोथरूड शाखा(स्वमालकीची वास्तु) | (०२०) २५३९५२००/ ९९२२४४४१५७ |
| ०८ | मार्केट यार्ड शाखा | (०२०) २४३६०९६६ / ९९२२४४४१५८ |
| ०९ | निरा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११५) २४२४७७ / ९९२२४४४१५९ |
| १० | फलटण शाखा | (०२१६६) २२२७७७ / ९९२२४४४१६१ |
| ११ | करमाळा शाखा | (०२१८२) २२०९७७ / ९९२२४४४१६० |
| १२ | बार्शी शाखा | (०२१८४) २२२०८९ / ९९२२४४४१६२ |
| १३ | पुणे - नगर रोड शाखा | (०२०) २७०११९४२ / ९९२२४४४१६३ |
| १४ | लक्ष्मी रोड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २४४५५५१७ / ९९२२४४४१६४ |

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| १५ | हडपसर शाखा | (०२०) २६९८१८६६ / ८३८०००४२९२ |
| १६ | सातारा शाखा | (०२१६२) २३७९४०, २३७९५५ /९९२२४४४१६५ |
| १७ | सोलापूर शाखा(स्वमालकीची वास्तु) | (०२१७) २७२९२६६, / ९९२२४४४१६६ |
| १८ | जळोची शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ /९८५०८९४५४९ |
| १९ | संगमनेर शाखा | (०२४२५) २२७६६६, २२२७०१/८३८०००४२९४ |
| २० | चाकण शाखा | (०२१३५) २४९११२ / ८३८०००४२९५ |
| २१ | शिरूर शाखा | (०२१३८) २२२२६६ / ८३८०००४२९७ |
| २२ | अहमदनगर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२४१) २३२७७०१ / ८३८०००४२९६ |
| २३ | नवी सांगवी शाखा | (०२०) २७२०३०८८ / ९९२२९११४०४ |
| २४ | भोसरी शाखा | (०२०) २७११००१६ / ९९२२४४४२०८ |
| २५ | सिंहगड रोड शाखा | (०२०) २४३५५१५५ |
| २६ | काष्टी शाखा | (०२४८७) २३११७७ / ९९२२४४४१७७ |
| २७ | शिरवळ | (०२१६९) २४५२४४ /९९२२४४४१८८ |
| २८ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष) | (०२११२) २४४२५४ / ९०२८७७७२४३ |

## ❊ संचालक मंडळ ❊

**श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची**
अध्यक्ष

**श्री. अविनाश रमेश लगड**
उपाध्यक्ष

**श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर**
कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| **श्री. रमणिक रामजी मोता** | **श्री. सचिन सदाशिव सातव** | **ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी** |
| **श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के** | **श्री. दिग्विजय पोपटराव तुपे** | **श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर** |
| **श्री. आदेश अनिलकुमार वडुजकर** | **श्री. उध्दव सोपानराव गावडे** | **श्री. सुरेश गुलाबराव देवकाते** |
| **श्री. विजयराव प्रभाकर गालिंदे** | **श्री. कपिल राजेंद्र बोरावके** | **डॉ. वंदना उमेश पोतेकर** |
| **सौ. कल्पना प्रदिप शिंदे** | **श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे**<br>तज्ञ संचालक (सी.ए.) | **श्री. सतिश शिवलिंग सालपे**<br>तज्ञ संचालक |

### बँकर्स

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

दि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बारामती

एच.डी.एफ.सी. बँक, पुणे

## दि. ३१ मार्च २०१६ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा या बाबतची माहिती

(₹ कोटीत)

| अनु . | शाखेचे नांव | ठेवी | कर्ज | नफा /तोटा |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारामती शाखा | २४५.०२ | १५७.८६ | १.४० |
| ०२ | इंदापूर शाखा | ९६.७० | ५६.७० | ०.५१ |
| ०३ | भिगवण शाखा | ४५.५९ | १६.३३ | ०.१८ |
| ०४ | दौंड शाखा | ४६.५२ | ४२.८४ | ०.४८ |
| ०५ | चिंचवड शाखा | १०४.४३ | ७४.५३ | ०.६९ |
| ०६ | कोथरूड शाखा | ६६.१३ | २०.२५ | ०.१७ |
| ०७ | मार्केट यार्ड शाखा (धनकवडी) | ६४.८२ | ४७.३४ | ०.४४ |
| ०८ | निरा शाखा | ५६.६० | १७.७३ | ०.२० |
| ०९ | फलटण शाखा | ३४.२३ | ३७.९१ | ०.३७ |
| १० | करमाळा शाखा | ३४.७१ | १५.३५ | ०.१४ |
| ११ | बार्शी शाखा | ४१.७४ | ४३.०८ | ०.१५ |
| १२ | पुणे - नगर रोड शाखा | ३२.१३ | ४७.१० | ०.३९ |
| १३ | लक्ष्मी रोड शाखा (सदाशिव पेठ) | २७.९७ | २५.३७ | ०.३१ |
| १४ | हडपसर शाखा | २१.८८ | २१.५१ | ०.११ |
| १५ | सातारा शाखा | ५३.६२ | ४७.२५ | ०.४६ |
| १६ | सोलापूर शाखा | २८.३१ | १६.३० | ०.४० |
| १७ | जळोची शाखा | ४९.३८ | ५४.४९ | ०.०७ |
| १८ | संगमनेर शाखा | ६३.४३ | ४.५७ | ०.०३ |
| १९ | चाकण शाखा | १९.३७ | ११.१७ | ०.०२ |
| २० | अहमदनगर शाखा | २२.५७ | २.९५ | ०.०३ |
| २१ | शिरूर शाखा | ३७.०२ | १८.३९ | ०.०३ |
| २२ | नवी सांगवी शाखा | १४.३१ | २.२० | ०.०३ |
| २३ | भोसरी शाखा | ११.४६ | ९.१५ | ०.०१ |
| २४ | सिंहगड रोड शाखा | २.४४ | - | -०.०५ |
| २५ | शिरवळ शाखा | - | ०.२० | - |
| २६ | काष्टी शाखा | ०.५२ | १.५० | - |
| २७ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष.) | ०.७२ | ०.०१ | -०.०१ |
| २८ | मुख्यालय | - | - | +१.६३ |
| | **एकूण** | **१२२१.६२** | **७९२.०८** | **८.१९** |



## सन २०१५-१६ चा ५५ वा अहवाल

**श्रीकांत सिकची (अध्यक्ष)**

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

आपल्या बँकेच्या ५५ व्या वार्षिक सभेच्या प्रसंगी मी आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने मनापासुन हार्दिक स्वागत करतो व आपल्या उपस्थितीबद्दल मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. आपल्या सर्वांचे भक्कम सहकार्य व सदिच्छा तसेच मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शनाखाली बँकेने अहवाल सालात भागभांडवल, स्वनिधी, ठेवी, कर्जे, वसुली या सर्वच क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी केलेली आहे. अहवाल सालात ठेवी ₹१०३५.१२ कोटीवरून ₹१२२१.६२ कोटी झालेल्या आहेत. ठेवीमध्ये ₹१८६.५० कोटींनी वाढ झालेली आहे. सभासद व ठेवीदारांच्या विश्वासाचे हे प्रतिक आहे. ठेवीमधील वाढ शे. १८.०२% इतकी आहे. ठेवीमधील वाढीबरोबरच कर्ज वाटपात योग्य वाढ होणे गरजेचे आहे. परंतु अहवाल सालात सुरूवातीचे सहा महिन्यात बँकेच्या निवडणूका, आर्थिक मंदी व अवर्षण यांमुळे कर्जवाटपात वाढ झालेली नव्हती. परंतु बँकेने ग्राहकाभिमुख योजना आखून सोनेतारण, कॅशक्रेडीट, हायरपरचेस कर्ज, वैयक्तिक कर्ज यांसारख्या कर्जाच्या जाहिराती करून कर्जवाटपात वाढ करण्याचा प्रयत्न केला आहे. अहवाल सालचे सुरूवातीस कर्जवाटप ₹६६०.५१ कोटींवरून ₹७९२.०८ कोटी इतके झाले आहे. कर्जवाटपातील वाढ ₹१३१.५७ कोटींनी झालेली आहे. ही वाढ शे. १९.९२% इतकी आहे. कर्जवाटपात वाढ होऊनही नफा कमी झाल्याचे दिसते. त्याचे कारण मागील सहामाहीत कमी झालेले कर्जवाटप तसेच बँकेने कॅश क्रेडीट खात्यावर समाधानकारक व्यवहार करणाऱ्या कर्जदारांना व्याजामध्ये १% पर्यंत रिबेट दिलेले आहे. तसेच मुदत कर्जावरील व्याजामध्ये १% कपात केली आहे. त्याचाही परिणाम नफा क्षमतेवर झालेला आहे. परंतु मंदीच्या काळात आपल्या कर्जदारांना व्याजामध्ये रिबेट देऊन त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न बँकेने केलेला आहे. भविष्यकाळात बँकेशी चांगले कर्जव्यवहार करणाऱ्या कर्जदारांची संख्या वाढून त्याचा परिणाम नफा क्षमता वाढीस होणार आहे. दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर वसुल भागभांडवल ₹२१.०३ कोटी इतके होते. अहवाल सालात भागभांडवलात ₹२.८३ कोटींनी वाढ होऊन वर्षअखेरीस भागभांडवल ₹२३.८६ कोटी इतके झालेले आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण (Capital to Risk Weightd Assets) शे. १३.३०% इतके आहे.

दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर बँकेचा ढोबळ नफा ₹१३.३२ कोटी इतका आहे. आयकर व कायदेशीर तरतुदी वजा करता बँकेस निव्वळ नफा ₹८.१९ कोटी इतका झाला आहे. आपल्या बँकेस तळेगांव, हिंजवडी, शिरवळ, काष्टी, टेंभुर्णी, श्रीरामपूर, पनवेल, सिन्नर, माळेगांव बु., मोहोळ, कोंढवा, वाई या ठिकाणी शाखा उघडणेस परवानगी मिळालेली असून त्यापैकी तळेगांव, काष्टी, हिंजवडी, टेंभुर्णी, शिरवळ या शाखा सुरू झाल्या असून राहिलेल्या ठिकाणी लवकरच शाखा सुरू होतील. त्यामुळे नजिकच्या काळात शाखांची संख्या ३६ वर जाणार आहे.

अहवाल सालात बँकेस भारतीय रिझर्व बँकेत चालु खाते उघडण्यांस परवानगी मिळालेली असून लवकरच बँकेचे स्वतःच्या RTGS साठी डाटा सेंटरमध्ये स्वतंत्र यंत्रणा उभारत असून बँकेस स्वतःचा IFSC कोड मिळालेला आहे. त्यामुळे इतर बँकांवर अवलंबून रहावे लागणार नाही. यामुळे खातेदारांना जलद सेवा देता येणार असल्याने ग्राहकांची संख्याही वाढण्यास मदत होणार आहे.

बँकेने मोबाईल बँकींग सेवा उपलब्ध करून दिलेली असून मोबाईल टू मोबाईल व्यवहार करणे शक्य झाले आहे.

चालु आर्थिक वर्षात ठेवींचे उद्दिष्ट ₹१३५० कोटींचे ठेवलेले असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने व दृढ विश्वासाने हे उद्दिष्ट आपण नक्कीच प्राप्त करू यात शंका नाही. तसेच सातारा, करमाळा, फलटण या ठिकाणी स्वतःच्या मालकीच्या जागेत शाखा स्थलांतर करण्याचा मानस आहे. त्यापैकी सातारा शाखेस जागा घेतलेली असून लवकरच या शाखेचे स्वमालकीचे जागेत स्थलांतर होईल.

त्याचप्रमाणे इंटरनेट बँकींगची सेवाही भविष्यकाळात सभासदांना व ग्राहकांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. अशा आधुनिक सेवा सुविधा आपण ग्राहकांना देत असल्याने आपली बँक खाजगी बँकेच्या किंवा राष्ट्रीयीकृत बँकेच्या बरोबरीने बँकींग सेवा देत आहे याचा सर्वांना अभिमान आहे.

अहवाल सालात मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवारसो, मा. आ. श्री. अजितदादा पवारसो माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.खा.सौ. सुप्रियाताई सुळे, मा.सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क यांनी व आपण सर्वांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य यामुळेच बँकेचा विकास व प्रगती होत आहे. तसेच बँकेचे उपाध्यक्ष, संचालक मंडळातील सर्व आजी व माजी सदस्य, मुख्यालयातील अधिकारी, शाखांचे शाखाधिकारी, सर्व सेवकवर्ग व सभासद बंधु भगिनी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले याबद्दल मी सर्वांचे मन:पासुन आभार व्यक्त करतो.

आपल्या सर्वांच्या संमतीने आपणास अहवाल सादर करीत असून त्यास आपण मंजुरी प्रदान करावी ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,

**श्रीकांत सिकची (अध्यक्ष)**

## ✻ सन २०१५-१६ चा ५५ वा अहवाल ✻

### सभासद

दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी बँकेचे एकुण सभासद १४३०५ होते. अहवाल सालात नव्याने ५६३ सभासद झाले आहेत व २२६ सभासद कमी झालेले आहेत. अहवाल वर्ष अखेरीस एकुण सभासदांची संख्या १४६४२ इतकी झाली आहे.

### भागभांडवल

अहवाल सालाचे सुरूवातीस बँकेचे भागभांडवल ₹२१.०३ कोटी होते. अहवाल सालात भागभांडवलात ₹२.८३ कोटींनी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१६ अखेर एकुण वसुल भागभांडवल ₹२३.८६ कोटी इतके झाले आहे. भागभांडवलातील ही वाढ शे. १३.४५% इतकी आहे.

भागभांडवलात होत असलेली वाढ बँकेचा स्वनिधी (नक्त मालमत्ता) वाढविण्यास पोषक आहे. दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर बँकेची नक्त मालमत्ता (नेटवर्थ) ₹६७.९३ कोटी इतके झालेले आहे.

### निधी

भागभांडवलातील वाढी बरोबरच निधीमध्ये होणारी वाढ नेटवर्थ साठी उपयुक्त आहे. दि. ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचा एकुण निधी ₹ ५७.७७ कोटी इतका होता. अहवाल सालात त्यामध्ये ₹ ७.६४ कोटींनी वाढ होऊन वर्षाअखेर बँकेचा एकुण निधी ₹ ६५.४१ कोटी इतका झाला आहे. ही वाढ शे. १३.२२% इतकी आहे.

### भांडवल पर्याप्तता प्रमाण (Capital to Risk Weightd Assets (CRAR))

भारतीय रिझर्व बँकेने भांडवल पर्याप्तता प्रमाण कमीत कमी ९% ठेवणे बंधनकारक केले आहे. आपल्या बँकेचे दि. ३१ मार्च २०१६ अखेर हे प्रमाण १३.३०% इतके आहे. आवश्यक प्रमाणापेक्षा शे. ४.३०% हे प्रमाण बँकेने जास्त ठेवलेले आहे. बँकेचा आर्थिक पाया भक्कम होत असल्याचे यावरून दिसुन येते.

### ठेवी

दि. ३१ मार्च २०१५ अखेर बँकेच्या ठेवी ₹१०३५.१२ कोटी इतक्या होत्या. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹१८६.५० कोटींनी वाढ होऊन अहवाल सालाअखेर बँकेच्या एकुण ठेवी ₹१२२१.६२ कोटी इतक्या झाल्या आहेत. ही वाढ शे. १८.०२% इतकी आहे.

ठेवीमधील ही वाढ प्रामुख्याने नव्याने सुरू होत असलेल्या शाखांमुळे झालेली आहे. बँकेने ठेवींच्या विम्याचा सहामाही हप्ता (DICGC) डिपॉझीट इन्शुरन्स क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन कडे नियमित पाठविण्यात येत आहे. आगामी काळात शाखांचे जाळे विस्तारून बचत ठेवी व चालु ठेवी वाढविण्याकडे बँकेचा भर राहणार आहे. (CASA Deposit) बँकेच्या CASA ठेवींचे प्रमाण शे. २०.७५% इतके आहे. हे प्रमाण ३०% पर्यंत वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे Cost of Funds कमीत कमी राखता येईल.

### कर्जे

बँकांमध्ये कर्ज वितरणाचे बाबतीत अतीशय तीव्र स्पर्धा आहे. या परिस्थितीत सुध्दा बँकेने कर्जवाटपात दुसऱ्या सहामाहीत चांगली कामगिरी केली आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेची कर्जे ₹ १३१.५७ कोटींनी वाढून दि. ३१ मार्च २०१६ अखेर एकुण कर्जाची रक्कम ₹७९२.०८ कोटी एवढी झाली आहे. ही वाढ शे. १९.९२% आहे. कर्जवाटपात वाढ करताना गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न केला आहे. छोटे व्यापारी, छोटे उद्योजक, फेरीवाले, भाजी विक्रेते, वैयक्तिक कर्जे यावर जादा लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. औद्योगिक मंदी व दुष्काळ यांमुळे व्यापारी कर्जे मोठया प्रमाणावर वाढत नाहीत त्यामुळे ग्राहकांचे सोयीनुसार योजना आखून कर्जे वाढविण्यावर लक्ष देण्यात येत आहे. सोने तारण, वाहन तारण या कर्जाच्या जाहीराती करून कर्जे वाढविणेत आलेली आहेत. भारतीय रिझर्व बँकेच्या कर्ज निकषांचे पालन करून कर्ज वितरण करण्यात आले आहे.

## ❋ सन २०१५-१६ चा ५५ वा अहवाल ❋

अहवाल सालात चांगल्या कॅश क्रेडीट खातेदारांना व्याजामध्ये रिबेट देण्याचा तसेच मुदत कर्जावरील व्याजाचा दर कमी करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. त्याचा परिणाम बँकेच्या नफ्यावर होणार होता तरीसुध्दा सभासदांना सध्याच्या मंदीचा व अवर्षणाच्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी व त्यांचा व्याजाचा भार कमी करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. त्यामुळे अहवाल सालात नफा कमी दिसत असला तरी भविष्यकाळात बँकेस चांगले खातेदार मिळुन कर्जवाटप वाढण्यास मदत होणार आहे व परिणामी नफाक्षमता निश्चित वाढणार आहे.

अहवाल सालात पर्जन्यमान चांगले झाले तर त्याचाही परिणाम कर्जवाटपामध्ये वाढ होऊन बँकेची नफाक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

### अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा

भारतीय रिझर्व बँकेचे निकषानुसार अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास बँकेने कर्जपुरवठा केलेला आहे.

समाजातील सर्व घटकांनाही बँकेने कर्जपुरवठा केलेला आहे. दि. ३१ मार्च २०१६ अखेर अग्रक्रम क्षेत्रास शे. ६२.१७ इतके कर्जवाटप केलेले आहे तर दुर्बल घटकांस शे. २६.१६ इतके कर्जवाटप केलेले आहे.

### एन.पी.ए.

गतसाली बँकेच्या निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण शे. ०.८०% इतके होते. अहवाल सालात हे प्रमाण शे. ०.७७% इतके कमी झालेले आहे. एन.पी.ए. कमीत कमी ठेवण्यामध्ये सर्व संचालक मंडळातील सदस्य, सर्व शाखाधिकारी, सर्व सेवक यांचा मोलाचा वाटा आहे. यापुढील काळात एन.पी.ए.चे प्रमाण ०% पर्यंत कमी करावयाचे उद्दिष्ट आहे. आपल्या सर्व सभासदांचे सहकार्य या कामी निश्चित मिळेल यात शंका नाही.

### सेवक वर्ग

संचालक मंडळाने आखून दिलेली ध्येय धोरणे प्रत्यक्षात अंमलात आणण्याचे काम सेवक वर्गावर असते.

अहवाल सालात ठेवी, कर्जे व वसुली या सर्वच क्षेत्रात मोठी वाढ झालेली आहे. याचे सर्व श्रेय सेवकवर्गाला आहे. सध्या माहिती व तंत्रज्ञानाचे युग असल्याने मोबाईल बँकींग, नेट बँकींग, RTGS, NEFT, ई टॅक्स पेमेंट इ. सर्व कामे संगणकावरूनच होत असल्याने या सर्व तंत्रज्ञानाची माहिती सभासद, खातेदार व ठेवीदारांपर्यंत पोहोचविण्याचे काम सेवक वर्ग करत आहे. त्यामुळेच सर्व आघाडयावर भरीव प्रगती होत असताना दिसत आहे.

बँकेचे कार्यकारी संचालक, उपसरव्यवस्थापक, शाखाधिकारी, वसुली अधिकारी, सर्वच सेवक अभिनंदनास पात्र आहेत.

### लाभांष

सभासदांना त्यांचे भागावर शे. १२% लाभांष वितरीत करण्याची मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता दयावी ही विनंती.

### मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे

मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक निकषानुसार कर्ज वितरीत केलेले नाही. मात्र पुर्वी दिलेल्या कर्जास मुदत असल्याने त्यांचेकडील मुदत कर्जाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | कर्ज प्रकार | वर्षाअखेरीस बाकी (₹) | थकबाकी (₹) |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक | मुदतीचे कर्ज | ५१.२४ | ०.०० |
| २ | नातेवाईक | मुदतीचे कर्ज | २.२० | ०.०० |
| | **एकूण** | - | **५३.४४** | **0.00** |

### नफा वाटणी

दि. ३१ मार्च २०१६ अखेर बँकेस ₹८१८७६८६०.९५ इतका नफा झालेला आहे. मागील वर्षीचा शिल्लक नफा ₹५३२५३.५४ जमेस धरता एकुण नफा ₹८१९३०११४.४९ नफा वाटणीस उपलब्ध आहे. सदर नफ्याची वाटणी पुढील प्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १ | गंगाजळी (रिझर्व फंड) | २,७५,००,०००.०० |
| २ | लाभांष | २,६०,००,०००.०० |
| ३ | इमारत निधी | १,८५,००,०००.०० |
| ४ | शाखाविस्तार निधी | १०,००,०००.०० |
| ५ | गुंतवणुक अवमुल्यन निधी | ७५,००,०००.०० |
| ६ | लाभांष समिकरण निधी | २,००,०००.०० |
| ७ | धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| ८ | आकस्मित निधी | २,००,०००.०० |
| ९ | सभासद शिक्षण निधी | ६,००,०००.०० |
| १० | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ११ | शिल्लक नफा | ३०११४.४९ |
| | **एकूण** | **८,१९३०११४.४९** |

### लेखापरिक्षण

भारतीय रिझर्व बँक व सहकारी कायद्या अंतर्गत नियम, सुचना यांचे पालन योग्य होत आहे की नाही हे तपासण्यासाठी मुख्य कार्यालयात स्वतंत्र लेखापरिक्षण विभाग सुरू करण्यात आला आहे. त्यामध्ये समावर्ती लेखापरिक्षण, वैधानिक लेखापरिक्षण, अंतर्गत लेखापरिक्षण, संगणक प्रणाली लेखापरिक्षण, गुंतवणुक लेखापरिक्षण इ. चे कामकाज बघीतले जाते. सन २०१५-१६ चे वैधानिक लेखापरिक्षण संगीता एस. अगरवाल ॲण्ड असो. चार्टर्ड अकौंटंट्स्, पुणे यांनी पुर्ण केले आहे. त्यांचा लेखापरिक्षण अभिप्राय अहवालात प्रकाशित केला आहे. अहवाल वर्षात बँकेचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' कायम राहिलेला आहे.

### भारतीय रिझर्व बँक तपासणी

बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ (ए.ए.सी.एस.) कलम ३५ अन्वये भारतीय रिझर्व बँक नागरी बँक विभाग मुंबई यांचे अधिकारी श्री. सी.एम. गोरेकर व श्री. खरे यांनी बँकेची तपासणी पूर्ण केली. तपासणी काळात त्यांनी केलेल्या सुचनांची बँकेने तात्काळ नोंद घेतील आहे. बँकेच्या आर्थिक स्थितीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### अॅन्टी मनी लॉन्डरींग सेल

रिझर्व बँक ऑफ इंडियाने अॅन्टी मनी लॉन्डरींग व कॉम्बॅटींग फायनान्स टेररिस्ट अॅक्टीव्हिटीज बाबत अनेक सुचना बँकेस केलेल्या आहे.

त्याची कडक अंमलबजावणी बँकेकडून केली जाते. त्यांचे सुचनेनुसार रोखींचा व्यवहार, संशयीत व्यवहार, खोटया नोटांचा अहवाल, नफा न मिळविणाऱ्या संस्थांचा अहवाल तयार केले जात आहेत व हे अहवाल फायनान्शीयल इंटेलिजन्स युनिट - इंडिया दिल्ली (FIU-IND) यांचेकडे वेळेवर सादर केले जात आहेत.

### शाखाविस्तार

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर शाखांची संख्या २३ होती. अहवाल सालात सिंहगड रोड, शिरवळ, काष्टी शाखा, व बारामती टेक्सटाईल पार्क येथे विस्तारित कक्ष सुरू करण्यात आला आहे. वर्षाअखेर बँकेच्या एकूण २६ शाखा, १ विस्तारित कक्ष व मुख्यालय अशी एकूण २८ कार्यालये ग्राहकांना सेवा देत आहेत. भारतीय रिझर्व बँकेने हिंजवडी, टेंभुर्णी, पनवेल, श्रीरामपुर, सिन्नर, माळेगांव बु. (ता.बारामती), कोंढवा, वाई या ठिकाणी शाखा उघडण्यास परवानगी दिलेली असून लवकरच याठिकाणी बँकेच्या शाखा सुरु करण्यात येतील.

### आभार

बँकेच्या दैनंदिन विकास व प्रगतीसाठी वेळोवेळी ज्या व्यक्तिंचे, संस्थांचे सहकार्य मिळाले त्यांचे ऋणनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये आपले आदरणीय लोकनेते मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, बारामती, मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. रामराजे नाईक निंबाळकर सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य, मा. खा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील, मा. श्री. राजेंद्र पवार, अध्यक्ष, बारामती अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मा. श्री. रणजित पवार, अध्यक्ष, बारामती सहकारी औद्योगिक वसाहत, यांचे बँकेच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. रमेश आप्पा थोरात व उपाध्यक्षा सौ. अर्चना घारे, इंदापुरचे आमदार मा. श्री. दत्तात्रय भरणे, मा. श्री. दशरथ माने माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद पुणे, मा. श्री. पुरूषोत्तम (दादा) जगताप अध्यक्ष सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, मा. श्री. अमरसिंह घोलप अध्यक्ष श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, मा.श्री. रंजनकुमार तावरे अध्यक्ष, दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, मा. श्री. बाळासाहेब तावरे माजी अध्यक्ष दि माळेगांव सहकारी साखर कारखाना तसेच बारामती नगर परिषदेचे अध्यक्ष श्री योगेश जगताप तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री श्री सदाशिव (बापू) सातव, श्री जवाहरशेठ वाघोलीकर, श्री इम्तियाज शिकीलकर, मा. सौ. जयश्रीताई सातव तसेच अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. शांतीशेठ सराफ इत्यादींनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

बारामती, इंदापूर, दौंड, करमाळा, बार्शी, सातारा, संगमनेर व इतर सर्व शाखा क्षेत्रातील नगर परिषदांचे अध्यक्ष, पुणे, पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर व बारामती तालुका दूध उत्पादक संघ, बारामती तालुका खरेदी विक्री संघ, बारामती तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद पुणे, श्री. काशिविश्वेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्या., बिल्डर्स असोसिएशन बारामती, बारामती स्विमर्स क्लब, व्यापारी महासंघ बारामती, बारामती मर्चंटस् असोसिएशन, तसेच बँकेच्या शाखांच्या कार्यक्षेत्रातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी बँकेच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बँकेस सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

आगामी वर्षात आपणा सर्वांचे असेच सहकार्य व मार्गदर्शन बँकेस मिळेल व प्रगतीचा पुढचा टप्पा गाठण्यास आपणा सर्वांची सक्रीय मदत होईल यात शंका नाही. भारतीय रिझर्व बँकेचे रिजनल ऑफिस मुंबई येथील सर्व अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक मा. श्री चंद्रकांत दळवी साहेब, अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सह. संस्था श्री सुनिल पवार साहेब, विभागीय सहनिबंधक

मा. श्री. संतोष पाटील साहेब, मा. श्री. धनंजय डोईफोडे साहेब, सहनिबंधक (नागरी बँका) पुणे, मा. श्री. आनंद कटके साहेब जिल्हा उपनिबंधक पुणे ग्रामिण, मा. श्री. शैलेश कोतमिरे साहेब अप्पर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, मा. श्री. पी. एल. खंडागळे अप्पर निबं धक, सहकारी संस्था, मा. श्री. के.सी.शर्मा, उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सह. बँक्स असो. लि. पुणे, मा. सौ. एस. व्ही. कडू मॅडम सहाय्यक निबंधक पुणे, मा. श्री. एस.एस. कुंभार साहेब सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती, मा. श्री. एस. पी. चव्हाण साहेब विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था, बारामती यांनी व त्यांच्या खात्यातील सर्व अधिकारी, तसेच सन २०१५-१६ सालचे शासकीय लेखापरिक्षक संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्, पुणे अंतर्गत लेखापरिक्षक मे. गुंड गावडे आणि कंपनी, मे. एम.डी. बलदोटा आणि कं. चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् फेडरेशन लि. मुंबई,दि पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असो., पुणे, बँकेचे सर्व सभासद, हितचिंतक व ग्राहक यांनी वेळोवेळी सहकार्य करून बँकेच्या विकासास हातभार लावल्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. वर्तमानपत्रे, साप्ताहिके यांचे सर्व संपादक व वार्ताहर मित्रांनी बँकेच्या काम काजाला वेळोवेळी दिलेल्या प्रसिध्दी बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अनेक ज्ञात अज्ञात थोर व्यक्ति व संस्थांनी वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

**आपला**

**श्रीकांत सिकची**
**अध्यक्ष,**
**दि बारामती सहकारी बँक लि.**

## ❊ लेखापरीक्षकांचा अहवाल ❊

(बँकींग रेग्युलेशन अॅक्ट सन १९४९ कलम ३१ नुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८१ (५-ब) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ खालिल नियम ६९ अन्वये)

दि बारामती सहकारी बँक लि., बारामती या बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१६ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व हिशोबाबाबत या बँकेचे सरकारी लेखापरीक्षक म्हणून आम्ही अहवाल सादर करीत आहोत.

बँकेच्या शाखाधिकारी यांनी सादर व प्रमाणित केलेल्या व मुख्य कार्यालयाने हिशोबात अंतर्भूत केलेल्या हिशोबी पत्रकासह, दि बारामती सहकारी बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीचा ताळेबंद व त्या तारखेस संपणाऱ्या नफा-तोटा पत्रकाचे आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

लेखापरीक्षण वृत्तांतातील आमचे शेरे व सूचनांसह पात्र राहून आम्ही निवेदन देतो की,

१. बँकेच्या हिशोबी पुस्तकावरून तसेच आम्हास दिलेल्या माहितीवरून व केलेल्या खुलाशावरून बँकेने तयार केलेला ताळेबंद पूर्ण व वस्तुनिष्ठ असून त्यात आवश्यक त्या सर्व बाबी समाविष्ठ आहेत. तो बँकेच्या आर्थिक बाबींचे खरे व वास्तव स्वरूप दर्शवितो.

२. (याकामी) आम्ही ज्यावेळी काही स्पष्टीकरण किंवा माहिती विचारली ते स्पष्टीकरण अगर माहिती बँकेने आम्हांस दिली व अशी माहिती समाधानकारक दिसून आली.

३. आमच्या लेखापरीक्षणात दिसून आलेले बँकेचे व्यवहार, बँकेच्या अखत्यारीतील आहेत.

४. बँकेच्या शाखांकडून मिळालेली नैमित्तिक पत्रके लेखापरिक्षणाचे कामी पुरेशी असल्याचे दिसून आले.

५. वरील हिशोबी वर्षाअखेरचे नफा-तोटा पत्रक हे खरे व वस्तुनिष्ठ असून नफ्याचे वास्तव चित्र दर्शविते.

६. आमच्या मते, सदरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे कायद्यातील तरतुदीस पात्र राहून केलेले आहे आणि

७. आमच्या मते, बँकेने कायद्यास अनुसरून हिशेबी पुस्तके ठेवलेली आहेत.

८. सन २०१५-१६ या वर्षासाठी बँकेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यांत आला आहे.

**स्वाक्षरी /-**

**दिनांक : २९ जुलै २०१६**
**स्थळ : पुणे**

**संगिता एस. अगरवाल अॅण्ड असोसिएटस् करिता**
**चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे**

## दिनांक ३१ मार्च २०१६

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| | भाग भांडवल | | |
| **४००००००००.००** | **अधिकृत भागभांडवल** | | **४००००००००.००** |
| **२१०३२१६८०.००** | **वसुल भागभांडवल** | | **२३८६००७२०.००** |
| | भाग प्रत्येकी रू २०/- चे | | |
| **५७७७३३६७९.२९** | **गंगाजळी व इतर निधी** | | **६५४०८१०५६.२९** |
| १२३२७४३८९.६६ | गंगाजळी निधी | १५६५८६१८६.६६ | |
| १३६६४४७८०.८० | इमारत निधी | १७१६४४७८०.८० | |
| १६०११२०.७८ | शाखा विस्तार निधी | २५०११२०.७८ | |
| ५५७३२.०० | कर्मचारी कल्याण निधी | ५५७३२.०० | |
| २७१९८.०० | सुवर्ण महोत्सव निधी | २७१९८.०० | |
| १०००००.०० | बँक पुरस्कार निधी | १०००००.०० | |
| ५५५८२१.०० | धर्मदाय निधी | ७५५८२१.०० | |
| ३५६८३५.६९ | आकस्मित खर्च निधी | ४५६८३५.६९ | |
| ३६३३१७०.०० | सभासद कल्याण निधी | ४०५३१७०.०० | |
| ५०५०००.०० | सभासद प्रशिक्षण निधी | ५०५०००.०० | |
| ३५४०६०२.९५ | लाभांष समिकरण निधी | ४०४०६०२.९५ | |
| २११९०१०००.०० | एन.पी.ए. निधी | २२२९०१०००.०० | |
| १०३००००००.०० | एन.पी.ए. निधी (गृहकर्ज व शेती कर्ज) | ११८००००००.०० | |
| १४९८६७४७.०० | थकव्याज निधी | १४९८६७४७.०० | |
| ६४३४४०२.४१ | गुंतवणूक घसारा निधी | ४८४९९८२.४१ | |
| २२८१६८७९.०० | संपत्ती पुर्नमुल्यांकन निधी | २२८१६८७९.०० | |
| १५००००००.०० | गुंतवणूक चढ उतार निधी | १०००००००.०० | |
| २६००००००.०० | सक्षम मालमत्तेसाठी तरतूद | २६००००००.०० | |
| **१०३५११५६६६४.२३** | **ठेवी** | | **१२२१६२१३३१२.६७** |
| ८६०१३९९९१७.०२ | मुदत ठेव खाते | ९४४११५११०७.८९ | |
| ८०२५२५७५.०० | आवर्तक ठेव खाते | ९९९३७७८६.०० | |
| १३३५५०४०६.०० | अल्प बचत ठेव खाते | १४१०४७४१९.०० | |
| ११९८८४१८५०.८६ | सेव्हींग्ज् ठेव खाते | १९७३६४७२४१.०३ | |
| ४१७११९९१५.३५ | चालू ठेव खाते | ५६०४२९७५८.७५ | |
| **१११३९२१२०२३.५२** | **बेरीज पुढील पानावर** | | **१३१०८८९५०८८.९६** |

## अखेरचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **२०९०६२४०९.२०** | **हातातील रोख शिल्लक** | | **२१९६२३८५४.०२** |
| | | | |
| **६८८५१०३६५.१८** | **इतर बँकांतील शिल्लक** | | **६१८४१७११५.१२** |
| | | | |
| **३४२६५९६३६४.८२** | **गुंतवणूक** | | **४०९७८३०५०२.३२** |
| | | | |
| **६६०५१३३१०६.५५** | **कर्जे** | | **७९२०७५४३८३.२१** |
| | | | |
| | **१ अल्पमुदतीची कर्जे** | | |
| ३६६२७३०५९८.२१ | अ) सुरक्षित कर्जे | ४०६२७८१७९८.९८ | |
| | पैकी थकबाकी रू. १३७६००९४७.१० | | |
| २५३७६३३८९६.०९ | **२ मध्यम मुदतीची कर्जे** | ३४१३००९६५३.२३ | |
| | अ) सुरक्षित रू. ३२६३०५६९१३.०२ | | |
| | पैकी थकबाकी रू. १४७६३५४४८.५७ | | |
| | ब) असुरक्षित रू. १४९९५२७४०.२१ | | |
| | पैकी थकबाकी रू. ७१११३३९.३० | | |
| | **३ दिर्घ मुदतीची कर्जे** | ४४४९६२९३१.०० | |
| ४०४७६८६१२.२५ | अ) सुरक्षित | | |
| | पैकी थकबाकी रू. १३३९३३८४.२२ | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **१०९२९३०२२४५.७५** | **बेरीज पुढील पानावर** | | **१२८५६६२५८५४.६७** |

## दिनांक ३१ मार्च २०१६

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **१११३९२१२०२३.५२** | **बेरीज मागील पानावरून** | | **१३१०८८९५०८८.९६** |
| | | | |
| **२०७९८१५.००** | वसुलीसाठी आलेली बिले | | **७७१८०४.००** |
| **९५२११४५.२०** | शाखा जुळवणी | | **३४५७१७८०.३७** |
| **५८१८३२६२.९३** | थकव्याज येणे | | **६०६८९४४४.०९** |
| | | | |
| **४०९११७०८.६२** | **इतर देणी** | | **४०२८५९१०.५९** |
| ८९९७०२३.०० | व्याज देणे | १२६६३९५६.०० | |
| ११६३२९७४.४४ | पेस्लीप / डी.डी. पेअबल | २०७३४७०१.०० | |
| १८६५३५७.०० | डिव्हीडंड देणे | १७६११७०.०० | |
| १८४१६३५४.१८ | इतर देणी | ५१२६०८३.५९ | |
| | | | |
| **९२५०३२५३.५४** | **नफा** | | **८१९३०११४.४९** |
| १५३५६.४५ | मागील वर्षाचा शिल्लक | ५३२५३.५४ | |
| ९२४८७८९७.०९ | चालू वर्षाचा | ८१८७६८६०.९५ | |
| **११३४२४११२०८.८१** | **बेरीज** | | **१३३२७१४४१४२.५०** |

| | | |
|---|---|---|
| | **संभाव्य देणी (Contingent Liabilities )** | |
| ६३९०००.०० | **बँक गॅरंटी** | ३९५०००.०० |
| २९८५५४८.०० | **डिपॉझीट एज्युकेशन अवेरनेस फंड (DEAF) (as per contra)** | ३१०४९६६.०० |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

कपिल राजेंद्र बोरावके
संचालक

डॉ. वंदना उमेश पोतेकर
संचालिका

## अखेरचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **१०९२९३०२२४५.७५** | **बेरीज मागील पानावरून** | | **१२८५६६२५८५४.६७** |
| **४३०८४६७३.७०** | **व्याज येणे (सरकारी रोखे गुंतवणुक)** | | **७३४९४९७७.०९** |
| **५८१८३२६२.९३** | **थकव्याज येणे** | | **६०६८९४४४.०९** |
| | | | |
| **२०७९८१५.००** | **वसुलीसाठी पाठविलेली बिले** | | **७७१८०४.००** |
| | | | |
| **३०९७६१२११.४३** | **इतर मालमत्ता** | | **३३५५६२०६२.६५** |
| १५७८१३९६५.३५ | जागा व इमारत | १६३८२६१५२.३५ | |
| १३७४९९६३४.८१ | डेड स्टॉक व फर्निचर | १४६४८९१५८.८१ | |
| ५४३८११२.०० | डिपॉझिटस् | २५६२५१०.०० | |
| २०६१७५८.९९ | शिल्लक छपाई माल | २९०४५१८.०१ | |
| ६९४७७४०.२८ | इतर येणी | १९७७९७२३.४८ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **११३४२४११२०८.८१** | **बेरीज** | | **१३३२७१४४१४२.५०** |

| | | |
|---|---|---|
| | **संभाव्य येणी** | |
| २९८५५४८.०० | **डिपॉझीट एज्युकेशन अवेरनेस फंड (DEAF) (as per contra)** | ३१०४९६६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| रमणिक रामजी मोता<br>संचालक | सचिन सदाशिव सातव<br>संचालक | ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी<br>संचालक | देवेंद्र रामचंद्र शिर्के<br>संचालक |
| आदेश अनिलकुमार वडुजकर<br>संचालक | उध्दव सोपानराव गावडे<br>संचालक | सुरेश गुलाबराव देवकाते<br>संचालक | विजयराव प्रभाकर गालिंदे<br>संचालक |
| सौ. कल्पना प्रदिप शिंदे<br>संचालिका | प्रितम सुर्यकांत पहाडे<br>तज्ञ संचालक (सी.ए.) | सतिश शिवलिंग सालपे<br>तज्ञ संचालक | श्रीनिवास गोपाळराव बहुळकर<br>कार्यकारी संचालक |

## दिनांक ३१ मार्च २०१६ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | खर्च | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|
| १२०३८७१९३८.०४ | ठेवीवरील व्याज | १५६५७३१३०९.७० |
| १२४२२९.०० | कर्जावरील व्याज | ८९४८४.०० |
| ११३७२५११५०.४८ | कर्मचारी वर्ग वेतन व भत्ते | १२३२५८६८३.४९ |
| ९०२२०३०.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | १०३५२८५५.०० |
| १२५००००.०० | ग्रुप ग्रॅच्युअटी खर्च | १५०००००.०० |
| ३६४५२१.३४ | संचालक मंडळ प्रवास खर्च | ५१७६९५.११ |
| २३१००००.०० | सरकारी व स्थानिक लेखापरीक्षण शुल्क | २०३४३५०.०० |
| ११६४१८८७.३० | जागा भाडे व नगरपरिषद कर | १२१४५२९६.०० |
| १२७९२४०३.०० | विमा खर्च | १५४१६८००.०० |
| ३५८६६६९.६० | विज खर्च | ४६९१५२२.०० |
| ७५०००.०० | लिगल फी | ९०००.०० |
| १३६१९०६.२० | पोस्टेज व टेलीफोन | १४९७६३७.०१ |
| २००६९२७.४४ | छपाई व लेखन साहित्य | २५६४४३८.९८ |
| १५१६२१९.०० | वृत्तपत्र जाहिरात खर्च | ११८४९३३.०० |
| १३६७६४३१.८९ | घसारा | १३९३७२२८.०४ |
| ६६५६९८.१८ | कर्मचारी वर्ग प्रवास खर्च | ४७१८४४.७२ |
| ८९३०२६६.६९ | सर्वसाधारण खर्च | ९०१३८०९.१८ |
| ५८४९७३.३० | समाशोधन शुल्क | ६५६७९८.९४ |
| १९१९०१.०० | वर्गणी व देणगी | २५०३६६.०० |
| ४०६७२४.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ३७४९८७.०० |
| ३७१५१७४२.५८ | आयकर | ३५००९८८०.०० |
| ५७२३५६९.३१ | इतर खर्च | १०७४४९९३.१५ |
| | **तरतूदी :** | |
| १३५००००००.०० | एन.पी.ए. तरतूद | ११००००००.०० |
| १५०००००.०० | एन.पी.ए. तरतूद (गृहकर्ज व शेती कर्ज ) | १५०००००.०० |
| १५०००००.०० | सक्षम मालमत्ता तरतूद | - |
| ७५०००००.०० | रोखे गुंतवणूक घसारा निधी तरतूद | - |
| ६४८३५०.०० | रोखे प्रिमियम ॲमॉरटायजेशन | ३८१५०००.०० |
| ९२४८७८९७.०९ | नफा | ८१८७६८६०.९५ |
| **१५४८११६४३५.४४** | **एकूण बेरीज** | **१९०९६४५७७२.२७** |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

## नफातोटा पत्रक

| दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे | उत्पन्न | दि. ३१ मार्च २०१६ ₹ पैसे |
|---|---|---|
| **१२३३९४३९७९.५४** | **कर्जावरील व्याज** | **१५२४१९९२४८.८२** |
| | | |
| **२९५४१६१४४.७२** | गुंतवणूकीवरील व्याज | **३५९३१४८२७.३२** |
| | | |
| **३८0000.५0** | शेअर्स वरील लाभांष | **४१४२०१.00** |
| | | |
| **४३५८२०९.४0** | कमिशन व वटाव | **५९८९७0१.९९** |
| | | |
| | **इतर उत्पन्न :** | |
| | | |
| **१४0१८१0१.२८** | फॉर्म फी, लॉकर भाडे व किरकोळ उत्पन्न | **१९७२७७९३.१४** |
| | | |
| **१५४८११६४३५.४४** | **एकूण बेरीज** | **१९0९६४५७७२.२७** |

रमणिक रामजी मोता
संचालक

सचिन सदाशिव सातव
संचालक

ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी
संचालक

देवेंद्र रामचंद्र शिर्के
संचालक

आदेश अनिलकुमार वडुजकर
संचालक

उध्दव सोपानराव गावडे
संचालक

सुरेश गुलाबराव देवकाते
संचालक

विजयराव प्रभाकर गालिंदे
संचालक

कपिल राजेंद्र बोरावके
संचालक

डॉ. वंदना उमेश पोतेकर
संचालिका

सौ. कल्पना प्रदिप शिंदे
संचालिका

प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)

सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक

श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

# सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चाची माहिती

## खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अंदाज केलेला खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च | कमी अगर जास्त |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १४५.०० | १५६.५७ | +११.५७ |
| २ | कर्जावरील व्याज | ०.५० | ०.०१ | -०.४९ |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | १२.५० | १२.३३ | -०.१७ |
| ४ | सेवक वर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युइटी अंशदान | १.५० | १.१८ | -०.३२ |
| ५ | सं.मं. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.१५ | ०.०६ | -०.०९ |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१५ | ०.०५ | -०.१० |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | १.५० | १.२१ | -०.२९ |
| ८ | टपाल, तार व दूरध्वनी व वीज खर्च | ०.५० | ०.६२ | +०.१२ |
| ९ | छपाई व लेखन साहीत्य | ०.४० | ०.२६ | -०.१४ |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.३५ | ०.२० | -०.१५ |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता (एन.पी.ए.) साठी तरतूद | २.०० | १.२५ | -०.७५ |
| १२ | समाशोधन/विमा, वर्गणी व देणगी | २.०० | १.६४ | -०.३६ |
| १३ | वृत्तपत्र जाहीरात | ०.२० | ०.१२ | -०.०८ |
| १४ | घसारा | १.७५ | १.३९ | -०.३६ |
| १५ | सर्व साधारण/वार्षिक सभा व इतर खर्च | १.७५ | २.०२ | +०.२७ |
| १६ | गुंतवणूक रोखे घसारा निधी तरतूद व आयकर | ७.०० | ३.८७ | -३.१३ |
| १७ | नफा | १०.०० | ८.१९ | -१.८१ |
| | **एकूण** | **१८७.२५** | **१९०.९७** | **+३.७२** |

## उत्पन्न

| अनु. | उत्पन्नाचा तपशिल | अंदाज केलेले उत्पन्न | प्रत्यक्षात झालेले उत्पन्न | कमी अगर जास्त |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १५०.०० | १५२.४२ | +२.४२ |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३५.०० | ३५.९३ | +०.९३ |
| ३ | कमीशन व वटाव | ०.५० | ०.६० | +०.१० |
| ४ | इतर उत्पन्न | १.७५ | २.०२ | +०.२७ |
| | **एकूण** | **१८७.२५** | **१९०.९७** | **+३.७२** |

## अहवालासोबत सादर करावयाची सांख्यिकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | ३१.०३.२०१५ | ३१.०३.२०१६ |
|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता प्रमाण | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार - १ | १२.१५ | १२.३९ |
| | ब) भांडवल निधी प्रकार - २ | १.१३ | ०.९१ |
| | एकूण | १३.२८ | १३.३० |
| २ | भांडवली पर्याप्ततेची वाटचाल | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार - १ | ५५२५.९५ | ६३३०.६६ |
| | ब) भांडवल निधी प्रकार - २ | ५१२.६७ | ४६२.६८ |
| | एकूण | ६०३८.६२ | ६७९३.३४ |
| | क) जोखिम संपत्तीच्या भाराचे गणन | ४५४७८.४६ | ५१०८२.५० |
| ३ | गुंतवणूक (एस.एल.आर.) | | |
| | १) पुस्तकी मूल्य | ३१३०७.५४ | ३३७४४.८९ |
| | २) मूळ किंमत | ३१०१२.७८ | ३३३१४.९० |
| | ३) बाजार मूल्य | ३१२९४.२४ | ३३७२८.४२ |
| | गुंतवणूक (नॉन एस.एल.आर.) | | |
| | १) एम.एस.सी.बँक मुदत ठेवी | ५.०० | ५.०० |
| | २) डी.सी.सी. बँक मुदत ठेवी | २५७०.०० | ५६८५.०० |
| | ३) इतर बँका मुदत ठेवी | ३४०.०० | १५००.०० |
| | ४) शेअर्स | ४३.४२ | ४३.४२ |
| ४ | कर्ज | | |
| | अ) स्थावर मालमत्ता | ३६३३.८० | - |
| | ब) बांधकाम | ९२१६.०० | १०४८५.८४ |
| | क) गृहतारण | ४०४७.६९ | ३०२०.५४ |
| | एकूण | १६८९७.४९ | १३५०६.३८ |
| ५ | शेअर्स आणि डिबेंचर्सवर कर्जे | नाही | नाही |
| ६ | संचालक व त्यांचे नातेवाईक, कंपनी, संस्था व | | |
| | १) संचालक व त्यांचे नातेवाईक | १५.९६ | ५३.४४ |
| | २) थकबाकी | १५.९६ | - |
| ७ | ठेवींचा सरासरी परिव्यय | ९.६२% | ९.६२% |

## अहवालासोबत सादर करावयाची सांख्यिकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात )

| अनु. | तपशिल | | ३१.०३.२०१५ | ३१.०३.२०१६ |
|---|---|---|---|---|
| ८ | अनुत्पादित मालमत्ता (एन.पी.ए.) | | | |
| | अ) सकळ थकबाकी | टक्केवारी | ४.३६% | ३.९०% |
| | | रक्कम | २८८१.३७ | ३०८७.६९ |
| | ब) निव्वळ थकबाकी | टक्केवारी | ०.८०% | ०.७७% |
| | | रक्कम | ५०९.४९ | ५९०.८१ |
| ९ | लाभदायकता/नफा क्षमता | | | |
| | अ) खेळत्या भांडवलाशी व्याजापासून मिळालेल्या | | १३.५५% | १४.२०% |
| | उत्पन्नाची टक्केवारी | | | |
| | ब) खेळत्या भांडवलाशी इतर उत्पन्नाची टक्केवारी | | १.२८% | ०.२०% |
| | क) खेळत्या भांडवलाशी ढोबळ नफ्याची टक्केवारी | | १.३५% | १.०१% |
| | ड) जिंदगीवरील परतावा | | १५.६१% | १६.६२% |
| | इ) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी टक्केवारी | | ०.८२% | ०.६२% |
| | फ) प्रति कर्मचारी व्यवसाय | | ८९७.१६ | ८८३.२० |
| १० | चालू वर्षात थकीत कर्जासाठी केलेली तरतूद | | १६५.०० | १२५.०० |
| ११ | गुंतवणुकीवरील घसाऱ्यासाठी केलेली तरतूद | | ८१.४८ | ३८.१५ |
| १२ | अनुत्पादक मालमत्तेतील बदल | | | |
| | आरंभीची शिल्लक | | २४८५.२७ | २८८१.३७ |
| | (-) वसुली | | ५३०.५५ | ४३९.३४ |
| | (+) नविन थकबाकी | | ९२६.६५ | ६४५.६६ |
| | सकळ थकबाकी | | २८८१.३७ | ३०८७.६९ |
| | (-) तरतूद | | २३७१.८८ | २४९६.८८ |
| | निव्वळ थकबाकी | | ५०९.४९ | ५९०.८१ |
| १३ | तरतूदी | | | |
| | सक्षम मालमत्ता | | १६५.०० | २६०.०० |
| | गुंतवणुक चढ उतार निधी | | १५०.०० | १००.०० |
| १४ | विदेशी चलन संपत्ती व देयता | | नाही | नाही |
| १५ | मुदत ठेवीसाठी भरलेल्या विम्याची रक्कम | | ५८.३२ | ६६.०४ |

## सन २०१६-२०१७ सालाचे अंदाजपत्रक

### खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अनुमानित खर्च |
|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १६९.०० |
| २ | कर्जावरील व्याज | ०.२५ |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | १३.५० |
| ४ | सेवक वर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युइटी अंशदान | २.०० |
| ५ | सं.मं. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.१५ |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१५ |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | २.०० |
| ८ | टपाल, तार व दूरध्वनी व वीज खर्च | ०.७० |
| ९ | छपाई व लेखन साहीत्य | ०.५० |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.३५ |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता (एन.पी.ए.) साठी तरतूद | २.५० |
| १२ | समाशोधन/विमा, वर्गणी व देणगी | २.०० |
| १३ | वृत्तपत्र जाहीरात | ०.२५ |
| १४ | घसारा | २.०० |
| १५ | सर्व साधारण खर्च व इतर खर्च | २.०० |
| १६ | गुंतवणूक, रोखे घसारा निधी व आयकर | ६.०० |
| १७ | नफा | ९.३० |
| | **एकूण** | **२१२.६५** |

### उत्पन्न

| अनु. | उत्पन्नाचा तपशिल | अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १७५.०० |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३५.०० |
| ३ | कमीशन व वटाव | ०.५० |
| ४ | इतर उत्पन्न | २.१५ |
| | **एकूण** | **२१२.६५** |

# परिशिष्ट अ

| बँकेचे नांव | दि बारामती सहकारी बँक लि. |
|---|---|
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | भिगवण रोड, बारामती, जि. पुणे पिन - ४१३ १०२ |
| नोंदणीचा दिनांक व क्रमांक | दि. २३/०९/१९६१ (रजि.नं. ३१२४६) |
| रिझर्व बँकेच्या परवान्याचा क्रमांक व दिनांक | डी.बी.ओ.डी./यु.बी.डी./एम.एच.४९८ पी - दिनांक १८ ऑगस्ट १९८६ |

| दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर | | (रक्कम ₹ कोटीमध्ये) |
|---|---|---|
| कार्यक्षेत्र | पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे | |
| शाखांची संख्या (मुख्य कार्यालयासह) | २७ + विस्तारित कक्ष ०१ | |
| सभासद | नियमित | १४६४२ |
| | नाममात्र | २७०९ |
| वसुल भागभांडवल | | २३.८६ |
| राखीव व इतर निधी | | ६५.४१ |
| ठेवी | बचत ठेवी | १९७.३७ |
| | चालु ठेवी | ५६.०४ |
| | मुदत व इतर ठेवी | ९६८.२१ |
| दिलेली कर्जे | सुरक्षित | ७७७.०९ |
| | असुरक्षित | १४.९९ |
| एकूण कर्जापैकी अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास | अग्रक्रम क्षेत्रासाठी | ६२.१७% |
| झालेल्या कर्जवाटपाची टक्केवारी | त्यापैकी दुर्बल घटकासाठी | २६.१७% |
| गुंतवणुक | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. व इतर ठेवी | ७१.९० |
| | म.रा.सह. बँक/पुणे जि. म. सह. बँक शेअर्स | ०.४३ |
| | सरकारी रोखे व इतर | ३३७.४५ |
| नेट एन. पी. ए. | | ०.७७% |
| शासकीय लेखापरिक्षण वर्ग सन २०१५-१६ | | 'अ' |
| एकूण कायम सेवक वर्ग | | २२८ |
| नफा | | ८.१९ |
| खेळते भागभांडवल | | १३२६.५६ |

## ✻ सभासद व खातेदारांना विनंती ✻

- कर्ज फेडीची मुदत लक्षात ठेवा व वेळेवर कर्जहप्ते भरून बँकेस सहकार्य करा.
- बँकेने दिलेले पासबुक प्रत्येक व्यवहारानंतर ते भरले आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. त्यातील नोंदी बँकेच्या सेवकाच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून घ्याव्यात.
- सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास तो कृपया ताबडतोब बँकेस कळवावा.
- कॅश-क्रेडिट खातेदारांनी दरमहा दिनांक ७ तारखेपर्यंत बँकेस स्टॉक स्टेटमेंट आणून द्यावेत व शेकडा दोन टक्के जादा व्याज आकारणी टाळावी.
- कर्जास तारण असलेल्या स्थावर मिळकतीवर बँक कर्जाची नोंद करून घ्यावी.
- कॅश-क्रेडिट कर्जाचे व कर्जासाठी तारण दिलेल्या मालाच्या विमा पॉलिसीचे वेळचेवेळी नुतनीकरण करावे.
- ₹ २०,०००/- पेक्षा जास्त रक्कमेची ठेव रोखीने परत घेता येणार नाही.
- ज्या सेव्हींग्ज् व चालू ठेव खातेदारांनी आपल्या पत्त्याबाबत ॲड्रेसप्रुफ व फोटो दाखल केले नसतील त्यांनी ते कृपया दाखल करावेत व बँकेकडून पासबुकावर फोटो लावून घ्यावेत. (के.वाय.सी. पूर्तता)
- बँकेचे सर्व सभासद व खातेदार यांचेसाठी एस.एम.एस. (SMS) बँकींगची सुविधा सुरू आहे. तरी सभासदांनी आपले भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक फॉर्ममध्ये भरून बँकेच्या नजीकच्या शाखेत पाठविण्याचे करावे.

## ✻ बँकेची वैशिष्ठे ✻

- बँकेचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे
- बँकेतील सर्व प्रकारच्या ठेवी (रू. १.०० लाखापर्यंतच्या) ठेव विमा योजने अंतर्गत संरक्षित.
- कोअर बँकींग, मोबाईल बँकींग, एस.एम.एस. बँकींग, ई-टॅक्स पेमेंट, आर.टी.जी.एस., नेफ्ट, ए.टी.एम., लॉकर्स इ. सुविधा उपलब्ध
- सर्व खातेदार व सभासदांसाठी नविन पॅन कार्ड काढण्याची, तसेच जनरल इन्शुरन्स व आर्युविमा इ. सुविधा उपलब्ध
- सर्व शाखा अत्याधुनिक बँकींग सुविधा व सुबक फर्निचर सह सुसज्जीत
- सुवर्ण आभुषणांचे तारणावर त्वरीत कर्ज उपलब्ध
- देशातील सर्व शहारावरील ड्राफ्ट सुविधा
- सभासदांना ₹ २.०० लाखापर्यंत अपघाती विम्याचे संरक्षण
- व्यापार, व्यवसाय व नोकरदार सभासदांसाठी विविध कर्ज योजना
- सी.टी.एस. २०१० चेक बुक सुविधा
- संपुर्ण भारतातील २,२०,००० पेक्षा जास्त ए.टी.एम. सेंटर्स व्दारे व्यवहार
- विज बिल भरणा सुविधा.
- रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडून RTGS, ATM व Mobile Banking इ. साठी स्वतःचा डाटा सेंटर उभारण्यास परवानगी.


ठेवी व कर्जावरील
व्याज ८२.०१ पैसे
तरतुदी ०.८५ पैसे
नफा ४.३१ पैसे
प्रशासकीय खर्च ७.०८ पैसे
व्यवस्थापकीय खर्च ३.९२ पैसे
आयकर १.८३ पैसे
रुपया असा
खर्च झाला


कर्जावरील मिळालेले
व्याज ७९.८४ पैसे
गुंतवणूकीवरील
व्याज १८.८२ पैसे
इतर उत्पन्न १.०४ पैसे
कमिशन व वटाव
०.३० पैसे
उत्पन्नाचा रुपया
असा आला

# दि बारामती सहकारी बँक लि.

## पारितोषिकांने गौरविलेली आपली बँक






नर सेवा– नारायण सेवा

सर्वोत्तम सेवा कार्यासाठी

नचिकेत गौरव पुरस्कार

२०१५

नरसेवा - नारायण सेवा या विचारातून आपण अनेकविध सेवा उपक्रम राबविले. अनेक कामांना मदतीचा हात दिला. यासाठी आपल्या सेवाकार्यासाठी २०१५ चा राज्यस्तरीय नचिकेत सर्वोत्तम सेवा गौरव पुरस्कार

बारामती सहकारी बँक लि., पुणे

संस्थेला पश्चिम महाराष्ट्र विभागातून देण्यात येत आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी संचालक व कर्मचारी वर्ग यांचे यासाठी मन:पूर्वक अभिनंदन.

संस्थेच्या सेवाकार्याचा प्रकाश दरवर्षी वृद्धिंगत व्हावा आणि वंचितांचे जीवन त्यामुळे उजळून निघावे. यासाठी आमच्या अनेकानेक शुभेच्छा!


या मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण :

मा. श्री. नितीनजी गडकरी

मा. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे

मा. श्री. सतीशजी मराठे

अजित सावरे
नचिकेत प्रकाशन



MSCBA

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई

शिल्पीन सेंटर, ४०, जी.डी.आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–४०००३१.

५०० कोटींपेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँका

दि बारामती सहकारी बँक मर्यादित, बारामती, जि.पुणे

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबईतर्फे दिल्या जाणाऱ्या '५०० कोटींपेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँका' गटामध्ये 'पुणे विभागातून' एकमेव पुरस्कारासाठी आपल्या बँकेची निवड झाली, याबद्दल आम्हाला मनस्वी आनंद झाला, आपले मन:पूर्वक अभिनंदन...!

सहकार चळवळीच्या प्रवाहात आर्थिक पारदर्शकता व आधुनिक माहिती, तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या बँकेने नावलौकिक संपादन केला आहे, हे निश्चितच अभिमानास्पद आहे. सर्वसामान्यांचे व समाजाचे हित यांची सांगड घालून आर्थिक लोकशाही म्हणजे सहकार ही प्रगत जाणीव आपण निर्माण केली आहे, हे सहकार चळवळीला बळकटी देणारे आहे. नवी उत्तुंग ध्येय घेऊन भविष्यातही आपली वाटचाल अशीच विकासात्मक राहील, असा आम्हाला विश्वास आहे. आपल्या बँकेसारख्या प्रगतीशील विकासाचा वेध घेणाऱ्या इतर बँकांना आपली वाटचाल प्रेरणादायी देणारी ठरावी.

आपल्या बँकेच्या भविष्यकालीन वाटचालीस आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा...!

| | | |
|---|---|---|
| सौ. स्वाती पांडे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | विश्वास जयदेव ठाकूर<br>कार्याध्यक्ष | विकास भालचंद्र सावंत<br>उपाध्यक्ष |

# दि बारामती सहकारी बँक लि.

## बँकेच्या टेक्सटाईल पार्क (विस्तारित कक्ष) उद्‌घाटन सोहळ्याची क्षणचित्रे

रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१६











# दि बारामती सहकारी बँक लि.

## बँकेच्या सिंहगड रोड शाखेचे उद्घाटन सोहळ्याची क्षणचित्रे

सोमवार, दिनांक ०७ मार्च २०१६













# दि बारामती सहकारी बँक लि.


## बँकेची सांपत्तिक स्थिती

रुपये लाखांत


### वसुल भाग भांडवल





### ठेवी




### दिलेली कर्जे




### नफा





# ✻ विनम्र श्रध्दांजली ✻

**अहवाल सालामध्ये भारतातील**
**जे ज्ञात, अज्ञात थोर नेते,**
**संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ,**
**लेखक, साहित्यिक, कलावंत, जवान,**
**शिक्षणतज्ञ, देशभक्त, कवी,**
**सामाजिक कार्यकर्ते,**
**बँकेचे माजी संचालक, कै. शिवाजीराव देवराव जगताप व**
**कै. श्रीपाद (नंदाशेठ) कृष्णाजी कुलकर्णी तसेच**
**बँकेचे सेवक, सभासद, ठेवीदार व**
**हितचिंतक दिवंगत झाले...**
**त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली.**
**ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**



## बँकेच्या खातेदारांसाठी खालील सेवा व सुविधा शाखेमध्ये उपलब्ध



### विज बिल भरणा केंद्र

महावितरण विज कंपनीच्या बिलांचा भरणा करण्याची सुविधा शाखेमध्ये उपलब्ध आहे.

### विमा पॉलिसीची सेवा

जीवन विमा व जनरल इन्शुरन्स्‌ची पॉलिसी सुविधा. तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अनुक्रमे रू. ३३० व रू. १२ इतक्या अत्यल्प वार्षिक हप्त्याने शाखेत उपलब्ध




### पॅन कार्ड सेवा

इनकम टॅक्स्‌ करीता आवश्यक असलेले पॅन कार्ड काढणेसाठी शाखाधिकाऱ्यांना भेटा




### ऑनलाईन टॅक्स्‌ सुविधा

आयकर, व्हॅट, सर्व्हिस टॅक्स्‌ इ. करांचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध




### मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा

विविध करारनाम्यासाठी मुद्रांक (Stamp Fee) व रजिस्ट्रेशन फी (Registration Fee) चा भरणा करण्याची सुविधा शाखेत उपलब्ध



### आर.टी.जी.एस. व नेफ्ट सुविधा

भारतात कोठेही रक्कम पाठविण्याची व मागविण्याची तत्पर सेवा



### ए.टी.एम. कम डेबीट कार्ड सुविधा

सेव्हिंग्ज व चालू खाते धारकांसाठी एटीएम कम डेबीट कार्डची सुविधा भारतातील कोणत्याही बँकेच्या एटीएम सेंटर मधून पैसे काढण्याची व पॉज मशिनव्दारे व्यवहार करण्याची सुविधा




### एस.एम.एस. व मोबाईल बँकींग सुविधा

आपल्या खात्यावरील व्यवहाराची माहिती क्षणार्धात मोबाईलवर मिळवा अगर व्यवहार करा



### सोने तारण

सोने दागदागिन्यांच्या तारणावर कमी व्याजदराने त्वरीत कर्ज उपलब्ध

**एनी ब्रँच बँकींग / संपूर्ण भारतातील २,२०,००० पेक्षा जास्त ए.टी.एम. सेंटर्स व्दारे व्यवहार**

## दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२